# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २९०/२०२४ दिनांक- ०७/०८/२०२४.

## "ऑनलाईन माध्यमातुन वेगवेगळया प्रकारे आर्थिक फसवणुक झालेल्या तक्रारदारांना एकुण १,५९,३९०/- परत करण्यास सायबर पोलीस ठाणेस यश"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे ऑनलाईन आर्थिक फसवणुक तसेच सोशल मिडीया संदर्भात तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात येतात. आर्थिक फसवणुकीच्या तक्रारींचे अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कमेचे व्यवहाराचे अवलोकन करुन त्यांची रक्कम रोखण्याकरीता तात्काळ कारवाई करण्यात येते.

| अनु.क्र. | तक्राराचे नाव | अर्ज क्रमांक | फसवणुक झालेली रक्कम | परत करण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. सचिन कामत | १५५८-बी/२०२४ दि.०८/०७/२०२४ | १९,४००/- | १९,४००/- |
| २. | श्री. सिंतुकुमार | २७४-बी/२०२४ दि.०९/०२/२०२४ | ९९९१/- | ९९९१/- |
| ३. | श्री. प्रमोद बोरदेवकर | १५६६-बी/२०२४ दि.२७/०७/२०२४ | ६९,९९९/- | ६९,९९९/- |
| ४. | श्री. राम सिंग | १६९०-बी/२०२४ दि.०३/०८/२०२४ | ६०,०००/- | ६०,०००/- |
| ५. | | एकुण | | १,५९,६९०/- |

नमुद तक्रारदार यांचे तक्रारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक, पेमेंट मर्चंट, ऑनलाईन ई-कॉमर्स साईट खात्यावर वळती झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने संबंधीत बँक, पेमेंट मर्चंट, ऑनलाईन ई-कॉमर्स साईट यांचेशी पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम खात्यात गोठविण्याबाबत कळविण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याची माहिती प्राप्त होताच रक्कम परत त्यांना मिळण्याकरीता कारवाई करण्यात आली. अश्याप्रकारे कारवाई करुन वरील तक्रारदारांना **एकुण १,५९,३९०/- रक्कम तक्रारदार यांना परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**
- **अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.**
- **Telegram Channel, facebook,Instagram अथवा Watsapp वरील जाहिरातींची पडताळणी केल्याशिवाय कोणतेही व्यवहार करुन नये. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **Work From Home नावाखाली Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.**

- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.
- ऑनलाईन खरेदी करीत असताना वेबसाईट किंवा खरेदी माध्यामाची पडताळणी केल्याशिवाय कोणताही व्यवहार करुन नये.
- ऑनलाईन खरेदी अथवा रक्कमेचे व्यवहार करताना प्राप्त क्यु आर कोड स्कॅन करु नये. याद्वारे आपली फसवणुक होण्याची शक्यता असते.
- बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.
- आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.
- फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/विलास खाटीक, पोअं/राहुल बन, पोअं/शुभम कांबळे, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**-------------0000------------**